# राशिभविष्य - फेब्रुवारी, २० १७

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==========================================================

**(१) मेष** - या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा काळ अतिशय अनुकुल व लाभदायक असल्याचा अनुभव येईल. पण त्यांनी आर्थिक व्यवहार मात्र काळजीपूर्वक करावेत, असे सांगावेसे वाटते. तसेच कुमार्गी
सहकाऱ्यापासून दूर राहावे. विशेष करून वौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना तसेच वकिली-सल्लागारी व्यवसाय असणाराना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. प्रवासाचे योग संभवतात. पण हर्शल, मंगळ प्रतिकुल असल्याने असह्य मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. अकारण शत्रुत्व निर्माण होणे, मानहानी होणे, गैर समजुतीने वाद, भांडणे होणे, आर्थिक चिंता त्रस्त करणे, काही मंडळीना जुन्या दबलेल्या प्रकरणांचा पुन्हा त्रास होणे अशापैकी घटनांचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. राहूमुळे दलाली, कमिशनवर व्यवसाय करत असणारांना काळ लाभदायक जाईल. पण विविध कारणांनी या राशीच्या मंडळीना संततिविषयक समस्या त्रस्त करतील. तसेच या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. गुरु-शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनाला दिलासा देणाऱ्या घटना घडतील व थोडी स्वस्थता लाभेल. मात्र अहंकारी , संतापी स्वभावावर नियंत्रण ठेवून व सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती लाभेल.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध घरीदारी सर्व ठिकाणी प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. वाद, मतभेद, गैरसमज अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. त्याचप्रमाणे शनि या राशीच्या अष्टम स्थानी असल्यामुळे जीवनसाथीचे व स्वत:चे अनारोग्य, अन्य मनस्ताप देणाऱ्या घटना अशापैकी कारणानी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे, अपेक्षाभंग होणे, असमाधानकारक घटना घडणे संभवते. जपा. महिन्याचा अखेरचा सप्ताह असह्य मनस्ताप होणे संभवते. जपा. नोकरी-व्यवसायात मानसिक ताण, विरोध, मानहानी , निराशा , दिरंगाई अशापैकी कारणानी त्रस्त व्हाल. काही युवकांना हातची नोकरी सोडून नवीन काही करण्याची उर्मी येईल. पण त्यांनी तो मोह कटाक्षाने टाळावाच. महिन्याच्या पूर्वार्धात मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण केल्यास त्याचा लाभ उत्तरार्धात मिळेल . . मोठ्या मंडळींच्या ओळखी होतील. हाती घेतलेल्या कामात प्रगती होईल. यश लाभेल. महत्त्वाकांक्षा पूर्ण होईल. आर्थिक लाभही होणे संभवते. काहीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणेही संभवते. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने या राशीच्या कला व्यवसाय व बौद्धिक व्यवसाय असणारांना प्रगतिकारक व लाभदायक होईल. तसेच या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. अपेक्षित संततिसुख लाभेल. कौटुंबिक सुख-समाधान व गृहसौख्य लाभेल. मात्र हर्षलमुळे काहीही कारणाने मित्रांत भांडणे, वाद, दुरावा निर्माण होण्याची शक्यता दिसते. जपा. ज्यांचे प्रेमसंबंध असतील ते दृढ होतील. श्रद्धा असेल तर श्रीशिवोपासना अनुकुल होईल.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ संमिश्र प्रकारचे अनुभव देणारा असल्याचाच अनुभव येईल. यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणाराना, वैद्यकीय व्यवसाय असणारांना , औषधविक्रेत्यांना, तसेच चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणाराना, द्रव पदार्थांचा व्यापार असणारांना व मानसोपचार तज्ञांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात मात्र थोडा मनस्ताप होणे संभवते. अन्य कोणत्याही प्रकारची नोकरी वा व्यवसाय असणाऱ्या मंडळीना मात्र संपूर्ण महिन्याचा काळ मनस्ताप देणारा, अपयश देणारा, इच्छा आकांक्षा अपूर्ण ठेवणारा , असह्य कामाचा ताण देणारा, अनारोग्यकारक व नैराश्य आणणारा असाच असल्याचा अनुभव

येईल. स्वतंत्र अन्य व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडणे संभवते. जपा. अशा परिस्थितीत मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून विपरीत काळ व्यतीत करणेच सुखाचे होईल. भावविचारांच्या भरात भरकटत जाऊ नका. तसेच ढोंगी आचरण करू नका. या राशीच्या तृतीया स्थानी असलेला राहू काही बाबतीत अनुकुल असला तरी काहीही कारणाने बंधुसुखात बाधा निर्माण करील. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी याच राशीत शनि असल्यामुळे जीवनसाथीच्या किंवा स्वत:च्या अनारोग्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. जपा. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुख-समाधान लाभेल; पण अन्य नातेवाईक मंडळीपासून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता जाणवते. जपा. तसेच या स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे काही मंडळीना स्थावर खरेदी करणे शक्य होईल; तर काहीना असलेली स्थावर अपेक्षेनुसार विक्री करणे शक्य होईल. श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ प्रतिकुल असा असल्याचाच अनुभव येईल. केवळ उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या लेखक-लेखिकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रकाशित होण्यास काळ अनुकुल होईल. तसेच लोखंड, कोळसा यांचा व्यापार-व्यवसाय असणारांना काळ लाभदायक होण्याची शक्यता आहे. या राशीच्या अन्य सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना सर्व दृष्टींनी काळ प्रतिकुल असाच असणार आहे. त्यामुळे त्यांनी सतत मनावर ताबा ठेवून व सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. इच्छा आकांक्षा अपूर्ण होतील. हाती घेतलेल्या कार्यात अपयश येणे संभवते. सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. बंधुवर्गाकडून मनस्ताप होणे, जीवनसाथीचे अनारोग्य, संततिविषयक समस्या, वाद, गैरसमज यांमुळे दाम्पत्य जीवनातील सुखात येणारी बाधा अशापैकी कारणानी त्रस्त व्हाल. जपा. नाविक दलातील मंडळींनी व अन्य जलसंबंधी नोकरी-व्यवसाय असणारांनी विशेष जपावे. अपघात भय संभवते. तसेच बाहेरचे उघड्यावरचे खाणे खाल तर अनारोग्यास निमंत्रण दिल्यासारखेच होईल. जपा. अशाही प्रतिकुल काळात काही मंडळीना दूरच्या प्रवासाचे तर काहीना परदेश गमनाचे योग येण्याची शक्यता दिसते. पण असा प्रवास जपून व सावधानतेने करा. प्रवासात त्रास होणे संभवते. पण शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने मधून मधून दिलासा देणाऱ्या घटना घडतील. सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखू शकले तरच या राशीचे विद्यार्थी अपेक्षित शैक्षणिक प्रगती करू शकतील. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचारित्रा"चे पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या संपूर्ण काळात शारीरिक-मानसिक आरोग्याकडे लक्ष देणे अगत्याचे होईल. शारीरिक उष्णता भडकून ताप येणे, अंगावर फोड येणे, हाडमोड होणे संभवते. जपा. काही मंडळीना मुळव्याधीचा तर काहीना अन्य उष्णता विकारांचा असह्य त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. तसेच जिद्दी स्वभावामुळे अकारण शारीरिक-मानसिक कष्ट-परिश्रम झाल्यास थकल्या सारखे वाटेल. जपा. मातृस्थानी तसेच या राशीच्या पंचम स्थानी शनि ग्रह प्रतिकुल असल्याने मुलांपैकी कोणाशी न पटणे, कोणाच्या अनारोग्याची चिंता निर्माण होणे, अशापैकी घटनांनी दु:ख व मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. अस्वस्थ मनस्थितीमुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. या काळात मनस्थिती अस्थिर होणे संभवते. त्यामुळे भावविचारात भरकटत जाणे होणे संभवते. अपघात भय आहे. जपा. मनावर ताबा ठेवा, सहनशील व्हा आणि शांतपणे जे जे घडेल ते करा. या राशीच्या सर्व नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होणार असल्याने त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात स्वत:च्या तसेच जीवनसाथीच्या अनारोग्याच्या समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. जपा. अशाही परिस्थितीत जन्मकुंडलीत योग असतील तर काहीना भूमिलाभ, काहीना धनलाभ, तर काहीना प्रतिष्ठा प्राप्त होणे संभवते. मन व बुद्धी स्थिर राखू शकले तरच या राशीचे विद्यार्थी अपेक्षित शैक्षणिक प्रगती करू शकतील. तसेच धनस्थानी

असलेल्या गुरु ग्रहामुळे आर्थिक स्थिती उत्तम राहील, व्यापार-स्वतंत्र व्यवसाय असणारांना प्रगती करणे शक्य होईल. कुटुंबात शुभ घटना घडतील. श्रद्धेने शिवोपासना करा.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ घरीदारी, सर्व ठिकाणी प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल असे दिसते. केवळ गुरु ग्रहाच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना व आध्यात्मिक उपासनेत रस असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक, सुखकारक व लाभदायक होईल. तसेच महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या नोकरदार मंडळीना नोकरीत मनोनुकुल घटना घडत असल्याचा अनुभव येईल व स्वस्थता लाभेल. राहूमुळे या राशीच्या काही मंडळीना परदेशगमनाची संधी मिळेल. आर्थिक लाभ होतील व हिशत्रूंपासून रक्षण होईल. पण महिन्याच्या पूर्वार्धात मात्र नोकरीत वरिष्ठांचा रोष, त्रास सहन करावा लागण्याची दाट शक्यता आहे. जपा. तसेच सुखस्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे विविध कारणानी कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. मातेचे आजार वा मातेशी न पटणे, प्रिय जनांपैकी कोणाचे दूरत्व घडणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. तसे घडले तर स्वस्थता लाभणार नाही. जपा. त्याचप्रमाणे जीवनसाथीचे अनारोग्य, दोघांतील वाद, मतभेद अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या ज्या मंडळींचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी गैरसमज, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. कोर्ट कचेरीची प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. कुसंगतीची बाधा होणे संभवते. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात संततीपैकी कोणाच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील. जपा. तसेच अनारोग्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. “ बावन्न श्लोकी गुरुचरित्रा” चे दररोज नियमितपणे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळीनी या महिन्याच्या संपूर्ण काळात आपल्या शारीरिक-मानसिक आरोग्याकडे लक्ष देणे जरूरीचे होईल. रवि -हर्षल -मंगळ हे ग्रह प्रतिकुल असल्यामुळे शारीरिक उष्णता वाढून उष्णताविकारांपैकी एखाद्या विकाराचा आजार त्रस्त करील. मुदतीचा ताप येणे, अंगावर फ़ोड येणे , पोटविकार, रक्तविकार बळावणे अशापैकी आजार होणे संभवते. जपा. तसेच अति विचार करू नका. डोकेदुखी वा मेंदूविकाराचा त्रास होण्याची शक्यता दिसते.. जपा. नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेल. घरी संतति विषयक समस्या किंवा संततीचे अनारोग्य, तसेच भावंडविषयक एखादी चिंता अस्वस्थ करील. त्यात चंचल मनस्थितीमुळे हातून नको ते घडू शकेल. जपा. पण हर्शल - मंगळ - शुक्र हे ग्रह नोकरी-व्यवसायातील अनुकुलतेच्या दृष्टीने पूरक होतील. या राशीच्या तृतीय स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे काही मंडळीना नवी उत्तम नोकरी मिळू शकेल; तर काहींना उत्तम आवडते कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यता दिसते. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. तसेच सामाजिक कार्याची ओढ असणारांनाही हाती घेतलेल्या सामाजिक कार्यात यश मिळू शकेल. या राशीच्या नोकरीत अधिकार असलेल्या मंडळीना सहज वाम मार्ग धन मिळणे शक्य असले तरी त्यांनी तो मोह टाळावाच. तसेच
ज्यांना जुगाराचा नाद आहे त्यांनीही तो नाद सोडणेच सुखाचे होईल. कौटुंबिक त्रास, भांडणे, अडचणी, अपेक्षाभंग अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. जपा. प्रवासाचे योग संभवतात. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत विविध कारणानी अडथळे येणे शक्य आहे. जपा. श्रद्धा असेल तर कुलदैवताची उपासना मन:शांती देईल.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच काही प्रमाणात अनुकुल होणार आहे. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना त्यांचे कर्तृत्व सिद्ध झाल्यास वरिष्ठांकडून कौतुक केले जाईल. काही मंडळीना बढती, वेतनवाढ, काहीना उच्च पद असे काही मिळू शकेल. शैक्षणिक, बौद्धिक, शास्त्रीय संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना , वैद्यकीय व कलात्मक कार्यक्षेत्र असणारांना, तसेच

यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना काळ अनुकुल, यशदायक व लाभदायक होईल. पण कौटुंबिक सुख व गृहसौख्य या दृष्टीने मात्र संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. कुटुंबात अनिष्ट घटना घडणे, कोर्ट प्रकरणे निर्माण होणे, आर्थिक समस्या त्रस्त करणे, अकल्पित खर्चाची समस्या निर्माण होणे, त्यासाठी कर्जबाजारी व्हावे लागणे, हितशत्रूंचा त्रास होणे, घरात गैरसमज, वाद, भांडणे होणे, कोणाशी न पटणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण स्वत:ला त्रास करून घेऊ नये. तसेच अकारण दगदग करू नये. मन व बुद्धी शांत, स्थिर राहण्यासाठी अहंकारी स्वभावावर ताबा ठेवून, जिभेला लगाम घालून व सहनशील बनून नम्रतेने आचरण करणेच सुखाचे होईल. गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने अशाही प्रतिकुल परिस्थितीत मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे सहज शक्य होईल. प्रेमिकांचे प्रेम सफल होईल. विवाहयोग येईल. काहीना नवे मित्र मिळतील. वैवाहिक सुखसमाधान लाभेल. मन:शांतीसाठी श्रीगजाननाची उपासना करा. तसेच मन:शक्ती प्राप्त होण्यासाठी श्रीहनुमान उपासना करा. हनुमानचालिसा स्तोत्राचे दररोज नियमितपणे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींना तुलनात्मक दृष्ट्या या महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल, असे वाटते. महिन्याच्या पूर्वार्धात स्वत:ची वा जीवनसाथीची आरोग्यविषयक समस्या त्रस्त कारीलसे दिसते. विशेष करून डोळ्याचे अनारोग्य होणे संभवते. तसेच वाढता खर्च, त्यात आर्थिक फसवणूक होणे वा आर्थिक नुकसान होणे, अशापैकी कारणांनी आर्थिक चिंता त्रस्त करील. जपा. त्याशिवाय काही मंडळीना

कौटुंबिक वाद, भांडणे , तसेच आप्तेष्टांशी भांडणे अशापैकी कारणानी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. तसेच प्रिय जनांपैकी कोणाचे घरातून दूर जाणे झाल्यामुळे काही मंडळी अस्वस्थ होतील. जपा. त्याचप्रमाणे नियोजित कार्यात अडथळे येणे, कुटुंबात असमाधानकारक घटना घडणे,

काही मंडळीना राहत्या जागेची समस्या त्रस्त करील; तर काहीना स्थावर संबंधीची समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. अशा सर्व परिस्थितीमुळे काही मंडळीना गहरे नैराश्य येणेही शक्य आहे. जपा. अशा प्रतिकुल परिस्थितीत अत्यंत भावनाशील मनस्थिती, स्वाभाविक दोष, कोणाशी पटवून न घेण्याची व सतत तक्रारी करण्याच्या वृत्तीमुळेही काही जणाना स्वस्थता लाभणार नाही. समोर ठाकलेल्या परिस्थितीत आहे त्यात सुखसमाधान मानून कालक्रमणा कराल तर खूपच सुखाचे होईल. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थितीत थोडी सुधारणा होणे संभवते. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना त्यांच्यातील कार्य कुशलतेमुळे वरिष्ठ प्रसन्न होतील व कौतुक करतील. काहीना पगारवाढ , बढती, तर काहीना एखादे उच्च पद वा मनाचे स्थान मिळण्याची शक्यताही जाणवते. चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्रात

कार्यरत असणाराना काळ अनुकुल, प्रगतिकारक , यशदायक व लाभदायक होईल. अध्यात्मात रस असणारानाही उपासानेद्वारे मन:शांती मिळू शकेल. काही मंडळीना जलप्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचे योग संभवतात. श्रद्धेने " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा " चे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळींचा नुकताच शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ सुरू झाला आहे. राशिस्वामी शनि ग्रहच असला तरी ही मंगळ ग्रहाची उच्च राशी आहे. तसेच शनि-मंगळ एकमेकाचे शत्रू असल्यामुळे साडेसातीच्या काळात या राशीच्या मंडळीनाच इतर शनि ग्रहाच्या मालकीच्या राशीपेक्षा अधिक मनस्ताप सहन करावा लागतो. ही गोष्ट ध्यानात घेऊन या राशीच्या मंडळींनी सतत मनावर ताबा ठेवून , सहनशील बनून व जिभेला लगाम घालून आचरण करणेच सुखाचे होईल. या राशीच्या व्यय स्थानी असलेला शनि ग्रह अत्यंत प्रतिकुल असल्यामुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडू शकतील. या काळात सर्व प्रकारचे आर्थिक व्यवहार सावधानतेने व विचारपूर्वक करणेच अगत्याचे होईल. नपेक्षा

मानहानी होणे, असह्य मनस्ताप होणे, कोर्ट लचांड मागे लागणे अशापैकी घटनांना सामोरे जावे लागेल. जपा. त्यामुळे शारीरिक- मानसिक अनारोग्य होणेही शक्य आहे. जपा. रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे नियोजित कार्यात अडथळे येणे, पीछेहाट होणे, फसवणूक होणे, आप्तेष्टांशी वाद, भांडणे होणे, आर्थिक चिंता त्रस्त करणे अशा प्रकारच्या घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. त्यामुळे शारीरिक-मानसिक आरोग्य बिघडून काही मंडळीना अतिशय थकवा येणे संभवते. रक्तदाब, हृदयविकार असे आजार असणारांनी तर विशेष जपले पाहिजे. काही मंडळीना त्वाकानचे दुखणे त्रस्त कारीलसे वाटते. अशा परिस्थितीतन अस्थिर, चंचल मनस्थितीमुळे काही मंडळीना कुसंगतीची बाधा होणेही संभवते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असला तरी उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधनात्मक कार्यात कार्यरत असणारांना मात्र काळ अनुकुल, प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक होणे संभवते. त्यामुळे महत्वाकांक्षा
वाढेल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. अशा परिस्थितीत गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने विविध प्रकारचे लाभ होतील व दिलासा मिळेल. प्रवासाचे योग येतील. शिवोपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. हनुमानचालिसा स्तोत्राचे नियमितपणे पठण करा.

**(११) कुंभ -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. त्यात सध्या या राशीच्या मंडळींची मनस्थिती अत्यंत कोमल झाली असावी असेही वाटते. तसेच शीघ्र मानसिक संवेदनांमुळे मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहरे नैराश्य येत असण्याची शक्यता जाणवते. रवि, बुध, मंगळ, हर्षल हे चार ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्याने सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. तसे अनुभव येत असतील तर मनावर व भावविचारांवर ताबा ठेवून आणि जिभेला लगाम घालून, सहनशील बनून व नम्रतेचे आचरण करून प्रतिकुल काळाशी मुकाबला करणेच सुखाचे होईल. वाचा स्थानी असलेला हर्षल ग्रह मन सतत लहरी, अस्वस्थ, चंचल ठेवतो. त्यामुळे आपल्या फटकळ बोलण्याने समोरची माणसे अकारण दुखावली जातील. . जपा. मंगळामुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील. त्यामुळे शारीरिक अनारोग्य होणेही संभवते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी विशेष जपावे. काही मंडळीना उष्णता विकार त्रस्त करतील. काहींना नेत्रविकाराचा तर काही मंडळीना मुखदंत विकाराचा आजार त्रस्त करीलसे दिसते. नोकरी-व्यवसायात अडचणी, अपयश, मानहानी अशापैकी घटना घडणे संभवते. जपा. कपटी विचार व वाममार्ग धनाचा मोह घातक ठरेल. जपा. तसेच कुसंगतीपासून दूर राहा. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे काहीही कारणाने वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. तसेच मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाचे अभ्यासाकडे दुर्लक्ष वा अन्य समस्या अशापैकी कारणांमुळे अपेक्षित संततिसुखात बाधा येणे संभवते. जपा. अशा संपूर्ण प्रतिकुल परिस्थितीतही ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचे योग असतील तर अशापैकी काहीना असा अचानक धनलाभ वा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. तसेच शुक्र ग्रहाच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने कौटुंबिक सुखसमाधान लाभू शकेल. श्रद्धा असेल तर शिवोपासना करा. तसेच दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(१२) मीन -** सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव अत्यंत अस्थिर, लहरी, चंचल अशा प्रकारचा झाला असावा, असे वाटते. तसेच कोणाचा धाक, दडपण वा कोणी चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या तर ते सहन होत नसावे, असेही वाटते. तसेच हट्टी, हेकट स्वभाव व मानापमान फार असल्यामुळेही शरीरपीडा, दगदग होऊन थकावट व अनारोग्य होणेही संभवते, जपा. महिन्याच्या पूर्वार्धात रवि-बुध अनुकुल असल्याने व त्यांचा गुरु ग्रहाशी शुभ योग होत असल्याने नोकरी-व्यवसायात मनोनुकुल घटना घडतील व सुखसमाधान लाभेल. विशेष करून शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना महिन्याचा पूर्वार्ध अधिक अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. काही मंडळीना नवे मित्र मिळतील. काहीना नोकरीत बढती ,

पगारवाढ , अधिकार पद असे काही मिळण्याची शक्यता दिसते. म्हणून नोकरी-व्यवसायात जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करा. महिन्याचा उत्तरार्ध मात्र प्रतिकुल होणार असल्यामुळे मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवून व सहनशील बनून नम्रतेचे आचरण करणेच सुखाचे होईल. नपेक्षा असह्य मनस्ताप, मानहानी , अर्थहानी यांचा असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. पण राहूमुळे या राशीच्या ज्या मंडळींचा परधर्मियांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना मात्र काळ अनुकुल व लाभदायक होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या कन्या राशीतील गुरु ग्रहामुळे विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरतील, काहींच्या प्रेमसंबंधात वाढ होईल. तसेच नवे स्नेह संबंध जुळून येण्याची शक्यताही दिसते. काहींना धनलाभ होणेही संभवते. स्वाभाविक दोषांवर नियंत्रण ठेवू शकलात तर वैवाहिक जीवनात अपेक्षित सुखसमाधान मिळू शकेल व कौटुंबिक सुखसमाधानही लाभेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे “ बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

=====00000O00000=====